# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव पश्चिम प्रदेश मुंबई यांचे कार्यालय

## शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामाकरीता घेणेबाबतची जाहिरात

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर कडील परिपत्रक क्रमांक मवरो/ मुले/ करारनियुक्ती/प्र.क्र.०६/१७-१८, दि.१४.०७.२०१७ चे अनुषंगाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव पश्चिम प्रदेश मुंबई यांचे कार्यालयामध्ये विवक्षित सेवा/कामासाठी एमपॅनलमेंट (Empanelement) करुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यासाठी जे सेवानिवृत्त सहायक वनसंरक्षक दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती पुर्ण करीत असलेल्या इच्छुक व पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

वरील कामाकरीता इच्छुक सेवानिवृत्त सहायक वनसंरक्षक संवर्गातील अधिकारी यांना कामाचे आवश्यकतेनुसार सेवा करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्याकरीता घेण्यात येईल व आवश्यकतेप्रमाणे सदर कालावधी / करार वाढविण्यात येईल. मात्र असा एकूण कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त असणार नाही. उक्त शासन निर्णयाची प्रत www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१६१२१७१७१८२४१३०७ असा आहे.

सेवा करार पध्दतीने भरावयाची पदसंख्या

| पदाचे नाव | पदाची संख्या |
|---|---|
| सहायक वनसंरक्षक | १ |

१) अर्हता व अनुभव:-

I. विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

II. करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी.

III. करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

IV. सहायक वनसंरक्षक पदावर सेवा केलेल्या अधिकाऱ्यांनीच अर्ज करावा.

V. वन्यजीव विभागांशी संबंधित तांत्रिक व कायदे विषयक कामांचा अनुभव असणे आवश्यक राहील.

VI. वन्यजीव विभागामध्ये किमान ३ वर्षे सेवा दिलेल्या अधिकाऱ्यांना विशेष पसंतीक्रम देण्यात येईल.

२) कामाचे स्वरुपः-

I. वनहक्क कायदा २००६ अंतर्गत न्यायालयीन प्रकरणे, खाजगी वनाची प्रकरणे हाताळणे.

II. दक्षता विभागाकडील कामकाज, गुन्हे कामाचे कामकाज, अवैध वृक्षतोडीचे तक्रारीबाबत विचारणा, वनगुन्हयात जप्त माल, वाहन यांची प्रकरणे, वन्यजीव बाबत कामकाज तसेच नियंत्रक अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार स्वतंत्रपणे मसुदा तयार करता येणे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणे.

III. वरीलप्रमाणे कामकाजासाठी इंग्रजी ज्ञान, स्वतंत्रपणे drafting करता येणे आवश्यक आहे.

IV. वन्यजीव व्यवस्थापन आराखडा, संवर्धन आराखडा, योजना प्रस्तावित करणे, बांधिल कामांची अंदाजपत्रके तपासणे, निसर्ग शिक्षण इत्यादी.

३) नियुक्तीचा कालावधीः-

प्रथम टप्प्यात देण्यात येणारी नियुक्ती ११ महिन्याकरीता राहील परंतू करार पध्दतीने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचे काम समाधानकारक आढळून आल्यास पुढील कालावधीकरीता अटी व शर्ती न बदलता नियुक्ती कालावधी वाढविण्यात येईल. हा कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त नसेल. काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास, कोणत्याही क्षणी नियुक्तीवरुन काढून टाकणे, नियुक्तीचा कालावधी कमी करण्यात येईल.

४) इतर अटी व शर्तीः-

I. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

II. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

III. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

IV. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

V. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व साधन सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

VI. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

VII. संगणकाचे ज्ञान असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

VIII. प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच सदर प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

५) वेतन:-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ सोबतच्या परिशिष्ठ-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे परिगणित करण्यात येईल.

६) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षा पर्यंतच कार्यरत राहू शकतील.

७) निवड करण्यात येणा-या अधिका-यास/व्यक्तीस या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या विहित नमुन्यात रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र सादर करावे लागेल.

८) अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहिलेले / टंकलिखित अर्ज (संपुर्ण माहिती असलेला जसे संपुर्ण नाव, जन्मतारीख, पत्ता, शिक्षण, अनुभव, काम केलेल्या विभागाचे नाव इत्यादी) दिनांक ०७.०९.२०२३ ते दिनांक १५.०९.२०२३ या कालावधीत या कार्यालयाचे ई-मेल आयडी apccfwlwest@gmail.com वर सादर करावेत.

९) सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.

**अर्जदारासाठी इतर आवश्यक सुचना**

निवड प्रक्रियेत अयशस्वी ठरलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांचे बाबतीत कोणताही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सुचना दिली जाणार नाही.

(डॉ. व्ही. क्लेमेंट बेन)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
वन्यजीव पश्चिम प्रदेश
मुंबई

# अर्जाचा नमुना

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव पश्चिम प्रदेश मुंबई यांचे कार्यालय
जुनी एम.एच.बी. कॉलनी, एल. टी. रोड,
बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१

विषय:- शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.

संदर्भ :- वन विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

मी वनविभागाच्या संकेतस्थळावरील तपशिलवार जाहीरात वाचली असून, माझा वैयक्तिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. संपुर्ण नांव :-

२. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-

३. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव :-

४. संपुर्ण पत्ता व मोबाईल / संपर्क क्रमांक/ ई-मेल आयडी:-

५. शैक्षणिक अर्हता:-

६. अनुभव :-

| ज्या कार्यालयात कार्यरत होते त्या कार्यालयाचे नांव | पदनाम | कार्यरत कालावधी | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

अर्जदाराचे संपुर्ण नाव व सही

## प्रतिज्ञापत्र

मी, ______________________ प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, आपण प्रसिध्द केलेल्या जाहीरातीमधील नमूद केलेल्या शासन निर्णयातील अटी शर्तींचे वाचन केले असून ते मला पुर्णपणे मान्य आहेत.

ठिकाण :-
दिनांक :-

स्वाक्षरी/-

(नांव व पदनाम)